आयुष्याशी रिलेट होणारं संगीत नाटक आहे कुठं रंगभूमीवर? तो तरूणवर्ग जुन्या काळची संगीत नाटकं, जुने विषय बघायला नाखूष आहे. अर्थात तेही प्रयोग फारसे होत नाहीतच म्हणा !

## उपाय –

१. नाट्यपरिषदेनं संगीत नाटक असा विभाग काढणे.

२. नाट्यनिर्मात्यांनी विविध वाहिन्याच्या अंतर्गत जे विविध संगीत कार्यक्रम चालतात, त्यातल्या चांगल्या गाणाऱ्या कलावंतांना नाट्यसंगीताचे शिक्षण देणे.

३. गद्य लिहिणाऱ्या नवीन नाटककाराकडून संगीत नाटक लिहून घेणे.

४. आजकाल शास्त्रीय संगीत उत्तम गाणारे अनेक युवा कलावंत मैफिली गाजवित असतात. त्यांना अभिनयाचं शिक्षण देऊन संगीत नाटक निर्माण करणे सहज शक्य आहे. वसंत देशपांडे यांचे नातू आणि प्रसिद्ध गायक राहूल देशपांडे यांनी नव्या कलावंतांना एकत्र आणून 'संगीत सौभद्र', 'संगीत कट्यार काळजात घुसली' इत्यादी संगीत नाटकं रंगमंचावर आणून त्याला अमाप लोकप्रियता मिळवून दिलेली सर्वश्रूत आहे.

बदल हा जीवनाचा स्थायीभाव आहे. संगीत नाटक जर हा बदल पचवून पुन्हा उभे राहिले, नवे प्रयोग, नवे संगीत आपलेसे करत राहिले तर पुन्हा एकदा संगीत रंगभूमीला सोनियाचे दिवस येतील असा मला विश्वास वाटतो.

## व्यावसायिक (गद्य) रंगभूमी

माझ्या काही वैशिष्ट्यपूर्ण नाटकांचा मी उल्लेख करणार आहे. त्या नाटकांच्या लेखकांची नावेच फक्त मी सांगणार आहे.

| नाटककार | | नाटक |
|---|---|---|
| वसंत कानेटकर | – | अश्रूंची झाली फुले |
| शं.ना.नवरे | – | सूर राहू दे |
| शं.ना.नवरे | – | गुंतता हृदय हे |
| अनिल बर्वे | – | थँक्यू मिस्टर ग्लाड |